आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
९ नोव्हेंबर २०२५ - रविवार

**ठळक बातम्या**

- उत्तराखंड राज्याच्या रौप्यमहोत्सवी स्थापना दिवस कार्यक्रमाला प्रधानमंत्र्यांची उपस्थिती

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची अंगोलाच्या राष्ट्राध्यक्षांबरोबर महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा

- बिहार विधानसभा निवडणुकीचा प्रचार आज संपणार

- आयसीस दहशतवादी संघटनेशी संबंधित ३ संशयितांना गुजरातमधे अटक

आणि

- टेनिसपटू नोव्हाक जोकोविचनं एटीपी अंतिम फेरीतून घेतली माघार

<><><><>

उत्तराखंड राज्याचा आज २५ वा स्थापना दिवस आहे. स्थापना दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत देहरादून इथं विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात प्रधानमंत्री मोदी विशेष टपाल तिकीटाचं प्रकाशन, उत्तराखंडमधल्या आठ हजार कोटी रुपयांच्या विकास कामांचं भूमीपूजन आणि उद्घघाटन केलं. तसंच प्रधानमंत्री पीकविमा योजनेतून २८ हजारांपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ६२ हजार कोटी रुपये हस्तांतरित केले. कार्यक्रमा आधी प्रधानमंत्र्यांनी उत्तराखंडची प्रगती आणि संस्कृती दर्शवणाऱ्या विविध प्रदर्शनांना भेट दिली तसंच विविध लाभार्थ्यांशी संवाद साधला.

यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी उत्तरखंडमधल्या नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. निसर्गाच्या कुशीत वसलेल्या उत्तराखंडमधे पर्यटनासह प्रत्येक क्षेत्रात विकास होत आहे, असं प्रधानमंत्री आपल्या समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हणाले. उत्तरखंडवासीयांना चांगलं आरोग्य, आनंद, संपन्नता लाभो अशी त्यांनी प्रार्थना केली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही उत्तराखंडमधल्या नागरिकांना स्थापना दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. आध्यात्मिक वारसा, सांस्कृतिक वैभव आणि नैसर्गिक सौंदर्याने संपन्न असं हे राज्य संपूर्ण देशाच्या श्रद्धेचं केंद्र आहे, असं शहा

समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हणाले. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, आरोग्य मंत्री जे पी नड्डा आणि इतर मंत्र्यांनीही उत्तराखंड स्थापना दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या मंगळवार पासून दोन दिवसांच्या भूतान दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यादरम्यान, मोदी आणि भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक, एक हजार वीस मेगावॅट क्षमतेच्या पुनात्सांगचु-२ या जलविद्युत प्रकल्पाचं उद्घाटन करतील. भारत आणि भूतान यांनी संयुक्तपणे हा प्रकल्प विकसित केला आहे. भूतानचे राजे जिग्मे सिंग्ये वांगचुक यांच्या ७० व्या जयंतीनिमित्त आयोजित समारंभात प्रधानमंत्री सहभागी होतील आणि भूतानचे प्रधानमंत्री त्शेरिंग तोबगे यांचीही भेट घेतील.

यावेळी जागतिक शांती प्रार्थना महोत्सवात प्रधानमंत्री मोदी सहभागी होणार असून थिंपूमधील ताशिचोडझोंग इथं भगवान बुद्धांच्या पवित्र अवशेषांच्या स्थळी प्रार्थना करणार आहेत.

दरम्यान, मोदी यांच्या भूतान भेटीच्या पार्श्वभूमीवर, भारतातून नेलेल्या भगवान बुद्धांच्या पवित्र अवशेषांचा एक भाग थिंपू इथला प्रमुख मठ, ताशिचोडझोंग इथं ठेवण्यात आला आहे. हा मठ भूतानच्या सर्वोच्च आध्यात्मिक आणि राजकीय संस्थांचं केंद्र मानला जातो. भारताचे सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री वीरेंद्र कुमार यांच्यासह भूतानचे प्रधानमंत्री त्शेरिंग तोबगे, इतर मंत्री आणि वरिष्ठ पदाधिकारी या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

<><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू दोन आफ्रिकी राष्ट्रांच्या दौऱ्यावर असून काल रात्री त्या अंगोलाची राजधानी लुआंडा इथ पोहचल्या . भारत -अंगोला द्विपक्षीय संबंधांना ४० वर्षं होत असून हे 40 वं वर्ष असून आतापर्यंतची भारतीय राष्ट्रपतींची ही पहिलीच अंगोला भेट आहे .अंगोलाचे अध्यक्ष जोआओ मॅनुअल गोंजाल्विस लौरेंको यांच्याबरोबर आज राष्ट्रपती मुर्मू द्विपक्षीय चर्चा करणार असून , त्यानंतर दोन्ही देशांदरम्यान विविध करारांवर स्वाक्षरी होईल. आपल्या दौऱ्यात राष्ट्रपती मुर्मू अंगोला राष्ट्र स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. तसंच तिथल्या संसदेला संबोधित करणार आहेत . अंगोलातल्या भारतीय समुदायाशीही राष्ट्रपती संवाद साधतील.

या वर्षाच्या सुरुवातीला भारताने अंगोलाच्या संरक्षण क्षेत्राच्या आधुनिकीकरणसाठी २०० दशलक्ष डॉलर्सची मदत जाहीर केली होती.

सध्या दोन्ही देश या करारावर चर्चा करत आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात 11 ते 13 नोव्हेंबर या कालावधीत बोत्सवाना मधे जाणार आहेत.

**<><><><>**

जागतिक विधी सेवा दिनानिमित्त, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी लोकांना न्याय, समता आणि कायदा सक्षमीकरणाची भावना जागवण्याचं आवाहन केलं आहे. हा दिवस आपल्याला या गोष्टीची जाणीव करून देतो की, कायद्याची उपलब्धता हा आपला हक्क असून, तो विशेषाधिकार नाही, असं त्यांनी समाज माध्यमवरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. नागरिकांनी कायदे सेवा आणि निष्पक्षता समाजाच्या सर्वात वंचित घटकापर्यंत पोहोचवण्याचे प्रयत्न करावेत असं आवाहन त्यांनी केलं आहे.

**<><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याच्या प्रचाराचा आज शेवटचा दिवस आहे. त्यामुळे रालोआ आणि महाआघाडीचे प्रमुख नेते आपल्या भाषणांमधून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

- ***- होल्ड व्हीसी - -***

*(बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यानंतर दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्याचा प्रचारही जोरदार झाला. सर्व पक्षांचे नेते आणि स्टार प्रचारकांनी मतदारांना आपली बाजू पटवून देण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. यात दोन्ही बाजूंनी आरोप प्रत्यारोपही झाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, काँग्रेसचे वरिष्ठ नेते राहुल गांधी यांच्यासह संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष नितीशकुमार आणि राजद नेते तेजस्वी यादव यांनी अनेक प्रचारसभा घेऊन मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. आजही ठिकठिकाणी सर्व प्रमुख नेत्यांच्या प्रचारसभा होणार आहेत.*

*संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष आणि मुख्यमंत्री नितीशकुमार आज औरंगाबाद, गया आणि कैमुर जिल्ह्यात अनेक सभांना संबोधित करणार आहेत. भाजपाचे वरिष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा सासाराम आणि अरवल इथं सभा घेतील. तसंच वरिष्ठ नेते आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह औरंगाबाद आणि कैमूर इथं प्रचारसभांना संबोधित करणार आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी पुर्णिया आणि किशनगंज इथं महाआघाडीच्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेणार आहेत. राजद नेते तेजस्वी यादव भभुआ, रोहतस आणि औरंगाबाद जिल्ह्यांमधे अकरा सभांना संबोधित करणार आहेत. तसंच जनसुराज्य पक्षाचे नेते प्रशांत किशोर यांच्यासह बसपा आणि एमआयएम चे नेतेही आपापल्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेणार आहेत.)*

दरम्यान, मतदानाच्या पहिल्या टप्प्यात व्हीव्हीपॅट पावत्या उघड्यावर आढळल्याप्रकरणी सहायक निवडणूक अधिकाऱ्याला निलंबित करण्यात आलं आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला असून चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

दुसऱ्या टप्प्यात १२२ मतदारसंघासाठी ११ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. १ हजार ३०२ उमेदवार रिंगणात उतरले असून तीन कोटी सत्तर लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. १४ नोव्हेंबरला बिहार विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे.

**<><><>**

आयसीस या दहशतवादी संघटनेशी संबंध असल्याच्या संशयावरून, गुजरात मधल्या दहशतवाद विरोधी पथकानं गांधीनगरमध्ये अदलाज इथून आज ३ जणांना अटक केली, आणि त्यांच्याकडून शस्त्र जप्त केली. ते देशाच्या विविध भागात हल्ला करण्याचा कट रचत होते, असा आरोप आहे. या प्रकरणी पुढला तपास सुरु आहे.

**<><><>**

केंद्र सरकारच्या ‘इंडिया सेमीकंडक्टर मिशन’ आणि ‘इंडिया ए-आय’ मिशन अंतर्गत, भारतात सेमीकंडक्टर आणि कृत्रिम बुद्धिमत्ता परिचालनाचा विस्तार करण्याच्या ‘इंटेल’ या कंपनीच्या  योजनांवर चर्चा करण्यासाठी, अमेरिकेतले भारताचे राजदूत विनय मोहन क्वात्रा यांनी काल इंटेलचे मुख्य कार्यकारी अधिकारी लिप बु टॅन यांच्याशी चर्चा केली.

केंद्र सरकारनं फॅब्रिकेशन, डिझाइन आणि उत्पादनाला चालना देण्यासाठी २०२१ साली ७६ हजार कोटी रुपये खर्चाची 'इंडिया सेमीकंडक्टर मिशन' ही योजना सुरु केली होती. त्या अंतर्गत, भारतानं २०२५ मध्ये, नोएडा आणि बंगळुरू इथं पहिली तीन नॅनोमीटर चिप डिझाइन केंद्र उघडली असून पाच सेमीकंडक्टर उत्पादन केंद्र बांधकामाधीन आहेत.

<><><><>

सर्बियाचा टेनिसपटू नोव्हाक जोकोविच यानं एटीपी २५० अथेन्स गटाचं विजेतेपद पटकावल्यानंतर तासाभरातच खांद्याच्या दुखापतीमुळे एटीपी अंतिम फेरीतून माघार घेतली आहे. हंगामातली ही शेवटची फेरी असून ती चुकण्याचं त्याचं हे सलग दुसरं वर्ष आहे. जोकोविचनं अथेन्स स्पर्धेत लॉरेन्झो मुसेटी याच्यावर ४-६, ६-३, ७-५ अशी मात करून आपल्या कारकीर्दीतलं १०१ वं, तर हार्डकोर्टवरचं ७२ वं विजेतेपद पटकावलं आणि हार्डकोर्टवर सर्वाधिक विजेतेपदांचा रॉजर फेडरर याचा विक्रम मोडीत काढला. आता जोकोविचनं एटीपीतून माघार घेतल्यामुळं त्याच्या जागी मुसेटी या फेरीत खेळेल. त्याचा पहिला सामना कार्लोस अल्काराज याच्याशी होणार आहे.

<><><><>

गोव्यात सुरु असलेल्या फिडे विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत भारताचे चार बुद्धीबळपटू चौथ्या फेरीत पोहोचले आहेत. त्यात आर प्रज्ञानंद आणि अर्जुन एरिगसी यांचा समावेश आहे. मात्र डी. गुकेश आणि दीप्तायन घोष हे तिसऱ्या फेरीत स्पर्धेतून बाहेर पडले.

<><><><>

देशाच्या वायव्य आणि मध्य भागात पुढले ५ ते ६ दिवस रात्रीच्या तापमानात २ ते ५ अंश सेल्सिअस घट होईल असा हवामान विभागाचा अंदाज आहे. विदर्भ आणि छत्तीसगडच्या अनेक भागांत किमान तापमानात जवळजवळ २ अंश सेल्सिअस घट होईल, तर राजस्थान आणि मध्यप्रदेशाच्या काही भागात उद्यापर्यंत थंडीची लाट राहील असा अंदाज आहे.

केरळ, माहे, तामिळनाडू, पुडुचेरी आणि करैकल मध्ये काही ठिकाणी आज जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

दरम्यान, राजधानी दिल्ली आणि परिसरात हवेची गुणवत्ता अत्यंत खालावली असून, आज सकाळी हवेचा गुणवत्ता निर्देशांक ३९१ इतका नोंदवला गेला.